# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 2003

**A**

**Time : 1 Hrs.** **Marks : 200**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

# एमपीएससी सहायक आयुक्त (वॉर्ड ऑफीसर) भरती परीक्षा (२१ सप्टेंबर २००३)

## चाळणी परीक्षा प्रश्नपुस्तिका

१) ''प्रपत्र'' हे ...... संसूचनाच्या प्रकारचे उदाहरण होय.
(1) अनौपचारिक (2) अधोगामी (3) औपचारिक (4) यापैकी कोणतेही नाही

---

२) पदांचे समतल गट ...... च्या आधारे करतात.
(1) विशेषित कार्य (2) जबाबदारी (3) वेतन (4) ज्येष्ठ–कनिष्ठ संबंध

---

३) स्थानिक शासन संस्था संबंधी केलेल्या वित्तीय आयोगाच्या शिफारशी, राज्य विधिमंडळाकडे पाठविण्याचा अधिकार ...... यांना आहे.
(1) मुख्यमंत्री (2) राज्यपाल (3) राष्ट्रपती (4) नगरविकास मंत्री

---

४) ''नियंत्रण कक्षा'' निर्धारित करण्याचे गणितीय सूत्र कोणी विकसित केले आहे?
(1) फेयाल (2) ग्रॅकुनास (3) आर्विक (4) सायमन

---

५) "POSDCORB" यातील ''आर (R)'' अक्षराने कोणती प्रक्रिया दर्शविली जाते?
(1) संशोधक (2) नियमन (3) जबाबदारी (4) प्रतिवेदन

---

६) खालीलपैकी कोणत्या प्रकरणात ''अधिसत्ते''चा वापर करण्यात आला आहे?
(1) मुख्याध्यापकांनी एका विद्यार्थ्याला शाळेतून काढले
(2) मुख्याध्यापकांना शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्याला शाळेतून काढण्याचे निर्देश दिले
(3) शाळा–अध्यक्षांनी विद्यार्थ्यांला काढून टाकण्यासाठी मुख्याध्यापकांचे मन वळविले
(4) विद्यार्थी संघटनेने मुख्याध्यापकांना विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकण्याचा आदेश मागे घेण्यास भाग पाडले.

---

७) खालील विधाने विचारात घ्या –
अ) प्रशासन ही व्यक्तींची कृती आहे.
ब) त्या व्यक्ती संघटित असतात
क) त्या लोकांना एकत्रित करतात
ड) त्या सुनिश्चित असे उद्दिष्ट साध्य करतात
(1) फक्त (अ) बरोबर आहे (2) फक्त (अ) व (ब) बरोबर आहेत
(3) फक्त (अ), (ब) व (क) बरोबर आहेत (4) सर्व बरोबर आहेत

---

८) व्यवस्थापनात ''समन्वय'' हे ...... आहे.
(1) एक अनौपचारिक कार्य (2) अनेक कार्यापैकी एक
(3) एक मूलभूत कार्य (4) एकमेव कार्य

---

९) निर्णय प्रक्रियेतील कोणता टप्पा चूक आहे?
(1) समस्येची व्याख्या करणे (2) योग्य माहिती संकलीत करणे
(3) पर्यायाचा विकास करणे (4) कोणत्याही एका पर्यायाची निवड करणे

---

१०) महानगरपालिकेच्या कार्यकारी प्रमुख म्हणून महापालिका आयुक्त या पदाची प्रथम मांडणी १९८८ मध्ये ...... यांनी केली.
(1) श्री. दादाभाई नौरोजी (2) श्री. गोपाळ कृष्ण गोखले
(3) श्री. फिरोजशहा मेहता (4) श्री. के. टी. शहा

---

११) *निश्चित विधान (वि.१)* – संघटनेत अधिकार प्रदान आवश्यक असते.
*कारण (वि.२)* – प्रत्येक व्यवस्थापकाच्या समतेला मर्यादा आहेत.
(1) (वि.१) व (वि.२) दोन्ही पर्याय आहेत आणि (वि.२) हे (वि.१) चे कारण आहे
(2) (वि.१) व (वि.२) दोन्हीय पर्याय आहेत परंतु (वि.२) हे (वि.१) चे कारण नाही
(3) (वि.१) योग्य आहे परंतु (वि.२) योग्य नाही
(4) (वि.१) योग्य नाही परंतु (वि.२) योग्य आहे.

---

१२) ...... हा अभिप्रेरणेचा मूलभूत हेतू असतो.
(1) कार्यक्षमता निर्माण करणे (2) उत्पादन वाढ
(3) कर्मचाऱ्यांना उत्तेजन देणे (4) कर्मचाऱ्यांचे नियंत्रण करणे

---

१३) योग्य विधान निवडा : संघटन लहान असो अथवा मोठे, ते खालील किमान दोन वैशिष्ट्यांसहित असते –
(1) ते समूहात्मक असते व त्याच्याकडे मोठ्या इमारती असतात
(2) ते समूहात्मक असते आणि ध्येय संपादनासाठी त्याचे अस्तित्व असते
(3) त्यांच्याकडे यंत्रसामुग्री असते आणि ध्येयसंपादनासाठी त्याचे अस्तित्व असते
(4) त्याच्याकडे यंत्रसामुग्री असते व ते समूहात्मक असते

---

१४) प्रशासन भक्कम नेतृत्व देण्यात असमर्थ ठरले तर काय होईल?
(1) समन्वयाचा अभाव असेल (2) निविदा उपक्रमात व्यक्तिगत हितसंबंध निर्माण होतील
(3) उद्दिष्टांच्या पूर्ततेसंबंधी अनास्था निर्माण होईल (4) कर्मचाऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण होतील

---

१५) मानवीय संबंधाच्या दृष्टिकोनातून औपचारिक अधिकाराचे स्त्रोत ...... असते.
(1) विश्वासार्हता (2) स्वीकृती (3) वैधता (4) सत्ता–स्पर्धा

---

१६) नियंत्रणाच्या दृष्टीने कार्य निष्पत्तीसंबंधीची माहिती योग्य जागी पाठविणे आवश्यक आहे. प्रश्न असा आहे की माहिती कोणाकडे द्यावी?
अ) मूल्यमापन होत असलेल्या व्यक्ती किंवा विभाग ब) मोजमापासाठी व्यक्ती नसल्यास खातेप्रमुख
क) अपर व्यवस्थापक ड) विशेषज्ञ विभाग
(1) वरील सर्वांना (2) (अ) आणि (ब) कडे (3) (क) व (ड) कडे (4) वरीलपैकी कुणाही एकाकडे

---

१७) गुणवत्ता नियंत्रणाच्या प्रक्रियेतील टप्प्यांचा अचूक क्रम ......
(1) प्रमाणे ठरविणे, उपाययोजना करणे, मोजमाप, प्रमाणे आणि प्रत्यक्ष यांची तुलना
(2) प्रमाणे आणि प्रत्यक्ष यांची तुलना, मोजमाप, प्रमाणे ठरविणे, उपाययोजना
(3) उपाययोजना, प्रमाणे आणि प्रत्यक्ष यांची तुलना, मोजमाप, प्रमाणे ठरविणे
(4) प्रमाणे ठरविणे, मोजमाप, प्रत्यक्ष व प्रमाण यांची तुलना, उपाययोजना

---

१८) प्रथम खालील विधाने काळजीपूर्वक वाचा –
अ) प्रत्येक औपचारिक संघटनेत अनौपचारिक संघटना असतात
ब) अनौपचारिक संघटना म्हणजे व्यक्तीचे परस्परांशी अनौपचारिक संबंध
क) अनौपचारिक संघटना म्हणजे व्यक्तीचे स्वाभाविक समूह
ड) अनौपचारिक संघटना नेहमीच औपचारिक संघटनेला घातक असते
(1) (अ), (ब) आणि (क) योग्य (2) (अ) आणि (ड) योग्य
(3) फक्त (ड) योग्य (4) (क) आणि (ड) योग्य

---

१९) नियंत्रणाविषयी खालील विधाने काळजीपूर्वक वाचा –
अ) नियंत्रणाचे काम नेहमी येणाऱ्या काळाशी निगडित असते
ब) नियंत्रण म्हणजे अंमलबजावणी योजनेनुसार होत आहे हे पाहणे
क) नियंत्रण म्हणजे आदेश देणे
ड) नियंत्रण म्हणजे शिक्षा करणे
(1) (क) (ड) बरोबर (2) फक्त (क) बरोबर (3) फक्त (ड) बरोबर (4) (अ) (ब) बरोबर

---

२०) कनिष्ठाच्या अधिकारक्षेत्राबाहेरील बाबींवर वरिष्ठाने आपले लक्ष केंद्रीत करावे अशी अपेक्षा ज्यात असते त्या तत्त्वाला व्यवस्थापनाचे ...... तत्त्व म्हणतात.
(1) शिस्तीचे (2) व्यवस्थेचे (3) कार्यविभाजनाचे (4) अपवादाचे

---

२१) नियोजनाविषयी खालील विभागांचा विचार करा –
अ) नियोजनाचा हेतू उद्दिष्ट गाठणे हा असतो
ब) नियोजनाचा हेतू अनिश्चितता दूर करणे हा असतो
क) नियोजनाचा हेतू काम कमी करणे हा असतो
ड) नियोजनाचा हेतू विविध क्षेत्रात प्रवेश करणे हा असतो
(1) (अ) बरोबर (2) (अ) (ब) (क) बरोबर (3) (अ) (ब) बरोबर (4) (क) (ड) बरोबर

---

२२) अधिकार व जबाबदारी यात नेहमी ...... असावी/असावे.
(1) संबंध (2) फरक (3) साम्य (4) संतुलन

---

२३) बरेच व्यवस्थापक अधिकार प्रदान करीत नाहीत कारण–

अ) त्यांना अहंगड असतो ब) त्यांना न्यूनगंड असतो

क) त्यांना अधिकार प्रदान करण्याची इच्छा नसते ड) त्यांना धोका पत्करावयाचा नसतो

(1) फक्त (अ) बरोबर आहे व (ब),(क) व (ड) चूक आहेत

(2) फक्त (अ) आणि (ब) बरोबर आहेत

(3) (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत

(4) चारही बरोबर आहेत

---

२४) भारतात व्यवस्थापन विकासाची सर्वोत्कृष्ट पद्धती कोणती?

(1) पाश्चात्य देशात विकसित व्यवस्थापनप्रणालीचा उपयोग

(2) व्यवस्थापन संस्थांची मोठ्या प्रमाणावर स्थापना

(3) औद्योगिक उपक्रम व व्यवस्थापन संस्था यात समन्वय

(4) शैक्षणिक सामग्रीचा विकास

---

२५) विधाने (A) आणि (R) वाचा व खालील पर्यायातून बरोबर उत्तर निवडा –

(A) भारतात गेल्या दशकात संगणकाचा उपयोग वाढला.

(R) अनेक कंपन्या संगणक निर्मिती करतात.

(1) (A) आणि (R) दोन्ही बराबेर आहेत आणि (R) हे (A) चे कारण आहे

(2) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे कारण नाही

(3) (A) बरोबर आहे परंतु (R) चुकीचे आहे

(4) (A) चुकीचे आहे परंतु (R) बरोबर आहे

---

२६) पुढे दिलेल्या पर्यायी उत्तरातून योग्य विधानांचा संच निवडा –

अ) व्हायरस हा एक असा प्रोग्राम आहे की तो डेटा फाईल्स व कमांड फाईल्स खराब करू शकतो.

ब) व्हायस हा एक असा प्रोग्राम आहे की जो सर्व माहिती सुरक्षित ठेवू शकतो.

क) व्हायरस अनावश्यक माहिती भरून फाईलचे आकारमान वाढवतो.

ड) व्हायरस सर्व माहिती पुसून टाकू शकतो.

(1) फक्त (अ) हे विधान बरोबर आहे

(2) फक्त (ब) हे विधान बरोबर आहे

(3) फक्त (अ), (ब) आणि (क) ही विधाने बरोबर आहेत

(4) (अ), (क) आणि (ड) ही विधाने बरोबर आहेत

---

२७) खालीलपैकी योग्य निर्णय कोणता ते सांगा –

(1) कारणे दाखवा सूचनेविना कायम कर्मचाऱ्याला नोकरीतून काढून टाकणे

(2) विक्रीचा कोटा निश्चित करून त्यावर विक्रेत्याचे वेतन ठरविणे

(3) कर्मचाऱ्यांना चहा पिण्याची सुट्टी नाकारणे

(4) कार्यालयातील शिपायांची सुविधा नाकारणे

---

२८) संदेशवहनाच्या प्रक्रियेत, अनेकदा माहिती अनधिकृत माध्यमांच्या साह्याने वाजवीपेक्षा द्रुत गतीने पसरू लागतात. अशा अनधिकृत स्त्रोतास म्हणतात ......

(1) कोलाहल (2) दूरसंवेदन (3) द्राक्षवेल (4) दूरसंचार

---

२९) नेतृत्त्व हे वैयक्तिक असते. व्यवस्थापक ज्यावेळी कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी उद्युक्त करतो, त्यावेळेस ती प्रक्रिया ...... होते.

(1) व्यक्तिनिरपेक्ष (2) व्यक्तिगत (3) परस्परांशी निगडित (4) आंतरक्रियात्मक

---

३०) व्यवस्थापकीय निर्णय ..... या घटकावर अवलंबून असतात.

(1) व्यवस्थापकाची कल्पनाशक्ती (2) आवश्यक असणारी सर्व माहिती
(3) इतरांकडून आवश्यक असणाऱ्या सूचना (4) माहिती व कल्पनाशक्तीचे एकत्रिकरण

---

३१) कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त बाणण्यासाठी खालीलपैकी कोणता पर्याय जास्त योग्य ठरेल?

(1) कामात चुका करणाऱ्यांना योग्य शिक्षा देणे
(2) कामात चुका करणाऱ्यांना कडक शिक्षा देणे
(3) कडक शिक्षा व कडक देखरेख
(4) ज्या पद्धतीने कर्मचाऱ्यांना स्वतःहून शिस्तीने वागण्यास उत्तेजन मिळेल अशी उपाययोजना करणे

---

३२) परिणामकारक निवड धोरणामध्ये खालील घटकांवर प्रामुख्याने भर दिला पाहिजे –

(1) 'काय' व 'कोठे' हा संघटनात्मक उद्दिष्टाचा भाग
(2) 'का' व 'काय' हा संघटनात्मक उद्दिष्टाचा भाग
(3) 'कोणास' व 'कोण' हा संघटनात्मक उद्दिष्टाचा भाग
(4) 'आम्ही' व 'ते' हा संघटनात्मक उद्दिष्टाचा भाग

---

३३) भारतात अस्तित्वात असणाऱ्या प्रशिक्षण पद्धतींचा उहापोह करताना व्यवस्थापन प्रशिक्षण आणि विकास यांचे विश्लेषण या स्वरूपात करावे लागेल –

(1) उपयुक्तता आणि परिणामकारकता (2) कार्यक्षमता व अकार्यक्षमता
(3) उत्पादकता व उत्पादन (4) संख्या व गुणवत्ता

---

३४) ''कर्मचाऱ्याला कामावरून काढून टाकण्यापूर्वी ...... ''

(1) कोणती परिस्थिती त्याच्या विपरीत होती यांचे स्पष्टीकरण कवण्याची संधी त्याला देता कामा नये
(2) त्याला शासन केले पाहिजे
(3) कोणती परिस्थिती त्याच्या विपरीत होती याचे स्पष्टीकरण करण्याची संधी त्याला दिली पाहिजे
(4) त्याच्यावर दंड भरला पाहिजे. त्याला शिक्षा सुनावली पाहिजे.

---

३५) एकमेकांचे सहकार्ययुक्त सामूहिक नेतृत्व म्हणजे काय ?
(1) व्यवस्थापनास त्याच्या सहकाऱ्यांवर कमी भरवसा व विश्वास असतो
(2) व्यवस्थापनास त्याच्या सहकाऱ्यांवर थोडा भरवसा व विश्वास असतो
(3) व्यवस्थापनास त्याच्या सहकाऱ्यांवर संपूर्ण भरवसा असतो
(4) व्यवस्थापनास त्याच्या सहकाऱ्यांवर अजिबात भरवसा व विश्वास नसतो

---

३६) कार्य संपतेमध्ये ...... याचा समावेश होतो.
(1) मूळ कामामध्ये अन्य कामांची भर
(2) कामामध्ये ऊर्ध्व (स्वरूपाचा) बदल
(3) कामामध्ये समांतर बदल
(4) कामाची मूल्य निश्चिती

---

३७) प्रथम खालील विधाने विचारात घ्या (ए आणि आर) –
*विधान (ए)* – शिस्तीसाठीची उपाययोजना ही योग्य, न्याय्य आणि कर्मचारी व त्यांच्या संघटनांना स्वीकारणीय असावी.
*कारण (आर)* – शिस्तीसाठीच्या उपाययोजनांचे कर्मचाऱ्यांवर दूरगामी व अप्रत्यक्ष गंभीर स्वरूपाचे परिणाम होतात.
(1) ए आणि आर हे दोन्ही सत्य आहेत आणि आर हे ए चे योग्य कारण आहे
(2) ए आणि आर हे दोन्ही सत्य आहेत परंतु आर हे ए चे योग्य कारण नाही
(3) ए हे सत्य आहे परंतु आर हे चुकीचे आहे
(4) ए हे चूकीचे आहे परंतु आर हे सत्य आहे

---

३८) समूहातील संघभावनेचा अर्थ ......
(1) समूहातील सदस्य एकमेकांशी कधीही भांडत नाहीत
(2) समूहातील सदस्यांची मते सारखीच असतात
(3) समूहातील सदस्यांना आपली मते मग ती निराळी असली तरी मांडण्याचे स्वातंत्र्य आहे असे वाटते
(4) समूहातील सदस्य एकमेकांशी अतिशय सौजन्याने वागतात

---

३९) भूमिका करण्याबाबतची खालील विधाने विचारात घ्या –
भूमिका करण्याचा भर ......
अ) प्रत्यक्ष करत शिकणे
ब) मानवी संबंध कौशल्ये शिकणे
क) मानवी संवेदनशीलता
ड) प्रशिक्षणार्थींची समरसता
(1) केवळ (अ) हेच योग्य आहे
(2) (अ) आणि (ब) हे योग्य आहेत
(3) (अ), (ब) आणि (क) योग्य आहेत
(4) सर्वच विधाने योग्य आहेत

---



Study CIRCLE

४०) पुढील विधानांमधून अचूक विधानांची निवड करा :

अ) सामूहिक सौदेबाजीकरिता सुदृढ आणि सशक्त कामगार संघटना असणे ही एक पूर्वअट आहे.

ब) काही घटकांचा अभाव असमाधान उत्प करण्याकरिता कारणीभूत असतो परंतु त्या घटकांच्या असण्याने फारसे समाधान मिळतेच असे नाही, कारण समाधानासाठी दुसरे अनेक घटक जबाबदार असतात.

क) आपल्या जबाबदाऱ्या ओळखून असणारे निष्णात व अनुभवी कर्मचारी एकतंत्री नेत्याला सहन करू शकत नाहीत.

ड) फक्त वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय मार्ग हे कर्मचाऱ्याला आपल्या कामगिरीविषयी समाधान मिळवून देतात.

(1) यातील फक्त (क) विधान बरोबर आहे
(2) यातील (अ) आणि (ब) विधाने बरोबर आहेत
(3) यातील (अ), (ब), (क) विधाने बरोबर आहेत
(4) यातील सर्व विधाने बरोबर आहेत

---

४१) पुढीलपैकी कोणते विधान कर्मचारी प्रशासनाचे संघटनेतील स्थान किंवा स्वरूप स्पष्ट करते?

(1) कर्मचारी प्रशासन हे तज्ञ कार्य आहे
(2) कर्मचारी प्रशासन हे प्रत्यक्ष व्यवस्थापनाचे कार्य करते
(3) कर्मचारी प्रशासन हे मुख्यत्वे तज्ञ कार्य आहे पण त्या विभागांतर्गत ते प्रत्यक्ष व्यवस्थापनाचे कार्य असते
(4) ते तज्ञ आणि प्रत्यक्ष दोन्ही प्रकारचे कार्य आहे

---

४२) एखादा कर्मचारी जेव्हा विभागात त्रासदायक ठरतो, तेव्हा समस्या सोडवण्याचा योग्य मार्ग म्हणजे ......

(1) त्या कर्मचाऱ्याची दुसऱ्या विभागात बदली करणे
(2) त्या कर्मचाऱ्याची दुसऱ्या ठिकाणी बदली करणे
(3) बदली न करता त्याचेवर योग्य कारवाई करून काम करण्यास प्रवृत्त करावे
(4) त्याला नोकरीवरून काढून टाकावे

---

४३) समूहामध्ये संघ भावना निर्माण करण्यासाठी खालील परिस्थिती असणे आवश्यक आहे –

(1) सदस्यांचे वय, शिक्षण, मातृभाषा यांच्यात समानता असणे
(2) सदस्यांची समान सामाजिक–आर्थिक परिस्थिती
(3) सदस्यांची मतभिता मान्य करणे व त्यांच्या विभि मतांबद्दल आदराची भावना बाळगण्यास शिकणे
(4) सदस्यांनी बाहेरच्यांसमोर सौजन्याची वागणूक ठेवण्याचे मान्य करणे

---

४४) एखाद्या कारखान्यातील कामगारांची उत्पादकता निरनिराळ्या प्रवृत्तकांवर अवलंबून असते. यापैकी एक प्रकार म्हणजे वैयक्तिक प्रवृत्तक व संघटनात्मक प्रवृत्तक उत्पादकता कोणत्या स्थितीत वाढते?

(1) वैयक्तिक प्रवृत्तक व संघटनात्मक प्रवृत्तक निरनिराळे आहेत
(2) वैयक्तिकप्रवृत्तक व संघटनात्मक प्रवृत्तक यांचा मिलाफ आहे
(3) या दोन्ही प्रवृत्तकांचा उत्पादकतेशी संबंध नाही
(4) वरीलपैकी कोणतेही विधान बरोबर नाही

---

४५) खालील विधानांतून योग्य विधानांची निवड करा –

(1) कर्मचारी भरती धोरणांचे एकमेव ध्येय योग्य कर्मचाऱ्यांची निवड करणे एवढेच आहे

(2) कर्मचारी भरती धोरणाचे एकमेव ध्येय योग्य पात्रतेचा कर्मचारी निवडणे एवढेच आहे

(3) कंपनीचे भरतीचे धोरण व जनतासंपर्क कार्यक्रम यांचे जवळचे नाते आहे

(4) कर्मचारी भरती धोरणाचे एकमेव ध्येय अनुभवी कर्मचारी निवडणे एवढेच आहे.

---

४६) 'मनुष्यबळ' हा संघटनेतील वैशिष्ट्यपूर्ण घटक आहे, कारण –

(1) मनुष्य बळाची टंचाई आहे
(2) त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटतो
(3) मन आणि आत्मा असलेला हा सजीव घटक आहे
(4) हा घटक संघटनेत प्रश्न निर्माण करतो

---

४७) बाहेरील मनुष्यबळाच्या उपलब्धतेचा अंदाज बांधताना पुढील घटकांचा विचार मुख्यत्वे करावा लागतो –

(1) देशातील कामगार विषयक कायद्यांची स्थिती

(2) सर्वसाधारण आर्थिक स्थिती, स्थानिक कामगार मार्केटची स्थिती व व्यावसायिक मार्केटची स्थिती

(3) औद्योगिक शांतता

(4) यापैकी काहीही नाही

---

४८) ''श्रम बाजार'' म्हणजे काय?

(1) श्रम बाजार म्हणजे उचित शासनाकडून मान्यताप्राप्त असलेली एक संस्था होय

(2) श्रम बाजार असे एक भौगोलिक क्षेत्र आहे जेथून मालक कर्मचाऱ्यांची भरती करतात व श्रमिक नोकरी मिळवितात

(3) श्रमिक मागणी व पुरवठा याविषयी स्पष्टीकरण करणारी एक धारणा म्हणजे श्रम बाजार होय

(4) संरचनात्मक असे मुख्य बाजारातील दुकान आहे

---

४९) तुमच्या कारखान्यांत एक कर्मचारी विक्रेता म्हणून काम करतो. त्याने ठराविक संख्येइतक्या लोकांशी संपर्क न साधल्यास त्याचा पगार कमी होतो. या परिस्थितीमध्ये –

(1) वैयक्तिक व संघटनात्मक प्रवृत्तक एकच आहेत
(2) दोन्ही प्रवृत्तके निरनिराळी आहेत
(3) दोन्ही प्रवृत्तकांचा संबंध नाही
(4) वरीलपैकी कोणतेही विधान सत्य नाही

---

५०) खालीलपैकी कोणते विधान खरे नाही?

(1) कार्यमूल्यमापन आणि झालेल्या कामाचे मोजमाप या संज्ञांचा अर्थ एकच आहे

(2) कार्यमूल्यमापनामध्ये एका कामाचे दुसऱ्या कामांचे संदर्भात तौलनिक मूल्य काढले जाते

(3) कार्यमूल्यमाप निवड प्रक्रिया सुरू करण्यापूर्वीच केले जाते

(4) कार्यमूल्यमापन व झालेल्या कामाचे मोजमाप या दोन्हींचा उपयोग वेतन निश्चितीसाठी होतो

---

५१) अंदाजपत्रक म्हणजे –
(1) भविष्यामध्ये घडणाऱ्या घटनांचा विचार करणे
(2) काय होणार आहे याचा अंदाज करणे
(3) नियोजित वेळेत आचरणात आणावयाचे धोरण व कार्यक्रम होय
(4) फेरबदलासाठी क्रिया, कृती व लक्ष्य यांचा संच होय

---

५२) योग्य निवड करून पुढील विधान पूर्ण करा – नगरपालिकांनी ...... तयार करण्याची आवश्यकता नाही.
(1) खरेदी अंदाजपत्रक
(2) विभागीय अंदाजपत्रके
(3) लवचिक अंदाजपत्रक
(4) स्थिर अंदाजपत्रक

---

५३) वित्त व्यवस्थापन हे फक्त '......' व्यवसायांनाच लागू पडते आणि '......' उद्योगात ते लागू पडत नाही.
(1) मोठ्या, छोट्या
(2) छोट्या, मोठ्या
(3) अंशतः मोठ्या, छोट्या
(4) वरीलपैकी एकही नाही

---

५४) अंकेक्षणाचा मुख्य उद्देश –
(1) हिशेब तपासणे
(2) चुका व गैरव्यवहार शोधणे
(3) चुका व गैरव्यवहारांना आळा घालणे
(4) हिशेबातील घोटाळे शोधून काढणे

---

५५) अंदाजपत्रकातील नियमावली पुस्तिका ही खालील कार्यावर आधारित अंदाज पत्रकांसाठीच असते –
(1) धोरण विषयक पत्रक
(2) जबाबदारी, कर्तव्ये, धोरणे, मार्ग वगैरेचे पत्रक
(3) फरक मोजणे व त्याचे विश्लेषणाची कारणमीमांसा असते
(4) उद्योग व्यवसायाला आवश्यक असलेल्या खेळत्या भांडवलाचे पत्रक

---

५६) उद्दिष्टपूरक अंदाजपत्रक हे पारंपरिक अंदाजपत्रकापेक्षा श्रेष्ठ आहे कारण –
(1) ते केवळ विभागणीची यादी नाही
(2) तो एक कृती आराखडा आहे
(3) अंदाजपत्रकीय वाटणीतील खर्चावर त्याचे नियंत्रण नसते
(4) वरीलपैकी काहीही नाही

---

५७) शून्याधारित अंदाजपत्रके हे पारंपरिक अंदाजपत्रकांपेक्षा सरस आहे कारण –
(1) तो संसाधन वाटण्याचा एक प्रयत्न आहे
(2) त्याला खर्चाच्या पातळ्या स्वीकारून वाढीव खर्चासाठी कारणमीमांसा लागते
(3) त्यात प्रत्येक रुपयाचा आणि कृतीचा आढावा घेऊन नियोजन केले जाते
(4) ते कार्यवाहीमुक्त नियोजन नाही व कार्यान्वित योजनाचे पण मूल्यांकन नाही

---

५८) हिशेबाचे लेखापरीक्षण हे ...... चे कार्य करते.
(1) जे सार्वजनिक पैसा वापरतात त्यावर लगाम असतो
(2) कर्मचाऱ्यावर नैतिक बंधने येतात
(3) पैशाच्या गैरवापरावर नियंत्रण बसून चूका व गैरव्यवहार कमी होतात
(4) मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक पैशाच्या गैरव्यवहारांवर फारसे प्रभावी नियंत्रण राखू शकत नाही

५९) सरकारी लेखापरिक्षण हे कोणत्या बाबींवर भर देते –
(1) आर्थिक तरतुदी
(2) अंदाजपत्रकीय तरतुदी
(3) पैशाच्या तरतुदी
(4) वरीलपैकी काही नाही

६०) भाडेतत्त्वावर घेतलेल्या मालमत्तेच्या भाड्याची हिशेबातील नोंद करण्यासंदर्भात कोणते विधान बरोबर आहे?
(1) आर्थिक वर्षातील खर्च म्हणून त्याची नोंद करावी
(2) त्याची हिशोबात नोंद करू नये
(3) भाडेपट्ट्याचा कालावधी संपल्याच्या वेळी त्याची नोंद करावी
(4) भांडवली खर्च म्हणून त्याची नोंद करावी

६१) प्रथम खालील बाबी विचारात घ्या –
अ) सार्वजनिक प्रकल्पातून मिळणाऱ्या लाभांशाचे प्रमाण प्रत्यक्षात खूप कमी असते.
ब) सार्वजनिक उद्योगांनी फायदा मिळवू नये.
(1) अ आणि ब दोन्ही बरोबर असून ब हेच 'अ' या स्थितीस कारणीभूत आहे
(2) अ आणि ब दोन्ही बरोबर असून 'ब' हे 'अ' या स्थितीस कारणीभूत नाही
(3) अ बरोबर परंतु ब हे चूक आहे
(4) ब बरोबर परंतु अ हे चूक आहे

६२) अंदाज आराखडे बनवणाऱ्यांच्या मते, एखाद्या कृतीला बहुतेक प्रसंगी लागणारा वेळ याला ...... म्हणतात.
(1) वेळेचा आशावादी अंदाज
(2) वेळेचा नकारात्मक अंदाज
(3) वेळेचा अतिसंभाव्य अंदाज
(4) अपेक्षित वेळ


६३) नागरीकरण व नागरी विकासाची धोरणे ...... असावेत.
(1) तात्पुरती धोरणे
(2) राज्य सरकारने ठरविलेली
(3) नगर नियोजन तज्ज्ञानी बनविलेली
(4) सातत्यपूर्ण, पद्धतशीर व दीर्घकाळ टिकणारी

६४) प्रकल्पांत आर्थिक गुंतवणूक केली जाते कारण –
(1) जुने काढून नवी उभारणी
(2) वाढ व विकास
(3) अनिवार्य व कल्याणकारी योजना
(4) वरीलपैकी कोणतेही एक

६५) प्रकल्पाचे मूल्यमापन परिणामकारक होऊ शकते जर –
(1) योग्यरीत्या निधी दिल्यास
(2) प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिल्यास
(3) प्रशासकीय कर्मचाऱ्यावर जबाबदारी सोपविल्याने
(4) योग्यरितीने तयार केलेल्या आराखड्याद्वारे कामाची माहिती मिळविल्यास

---

६६) खालील नेटवर्कचा अभ्यास करा –




हा प्रकल्प पूर्ण करण्याकरिता किमान किती दिवस लागतील?
(1) १६ दिवस (2) १२ दिवस (3) ४४ दिवस (4) २२ दिवस

---

६७) प्रकल्पाची सुसाध्यता खालील बाबींवर अवलंबून असते –
अ) मालकाची आर्थिक व तांत्रिक क्षमता
ब) कच्च्या मालाची उपलब्धता
क) बाजारपेठेचा अभ्यास
ड) बँकेकडून आर्थिक पाठबळ असणे
(1) फक्त अ बरोबर आहे
(2) अ, ब बरोबर आहेत
(3) अ, ब, क बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत

---

६८) विकासात्मक नियोजनात खालीलपैकी कोणत्या बाबींवर जास्त लक्ष पुरविले पाहिजे –
अ) लोकांच्या सहभागाकडे
ब) कर्मचाऱ्यांच्या सहभागाकडे
क) राजकीय पुढाऱ्यांच्या सहभागाकडे
ड) उद्योगधारकांच्या सहभागाकडे
(1) फक्त अ बरोबर आहे
(2) अ व ब बरोबर
(3) अ, ब व क बरोबर आहेत
(4) सर्व बरोबर आहेत

---

६९) नेटवर्क आराखड्याची फेर आखणी म्हणजे अपडेटींग होय, ही ज्या कारणाने होते, ते म्हणजे –
(1) काही किंवा सर्व कार्ये वेळापत्रकाप्रमाणे प्रगती पथावर आहेत
(2) काही किंवा सर्व कार्ये ही वेळापत्रकापेक्षाही पुढे चालली आहेत
(3) काही किंवा सर्व कार्ये ही वेळापत्रकांच्या मागे चालली आहेत
(4) वरीलपैकी कोणतेही कारण नाही

---

७०) पैशाची फेरवाटणी म्हणजे पैशाचे अंतर्गत हस्तांतरण हे केले जाते –
(1) एका खात्यातून दुसऱ्या खात्यात
(2) एका वर्ग विभागणीतून दुसऱ्या वर्ग विभागांकडे
(3) एका खात्यातील एका वर्ग विभागाकडून दुसऱ्या खात्यातील वर्ग विभागाकडे
(4) एका मंडळाकडून दुसऱ्या मंडळाकडे

---

७१) मुंबईसारख्या मोठ्या शहरात रोजगार मिळविण्यासाठी दुसऱ्या राज्यांतून अनेक लोक येत असतात. त्यामुळे शहराच्या नागरी सुविधा पुरविण्यावर ताण पडतो व त्यांचे दुष्परिणाम स्थानिक नागरिकांना भोगावे लागतात. या समस्येवर कायदेशीर आणि परिणामकारक अशा कुठल्या उपाययोजना करता येतील?
अ) इतर राज्यातील लोकांना शहरात येण्यास बंदी घालणे
ब) इतर राज्यातून रोजगार मिळविण्यासाठी येणाऱ्या लोकांवर कर आकारणी करणे
क) दर वर्षी इतर राज्यांतून येणाऱ्या लोकांच्या संख्येचा अंदाज करून नागरी सुविधा उपलब्ध करण्यासाठी मास्टर प्लॅन करणे
ड) राज्यातील इतर भागात उद्योग निर्माण करून रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी मास्टर प्लॅन करणे
(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (ब) व (क) (3) फक्त (क) व (ड) (4) फक्त (अ) व (ड)

---

७२) एका समुद्रकिनाऱ्यावर अनेक लोक समुद्रस्नानाचा आनंद घेण्यासाठी येतात. परंतु किनाऱ्याचा काही भाग समुद्र स्नानासाठी धोकादायक आहे व त्यामुळे दरवर्षी तेथे अनेक लोकांना जलसमाधी मिळते. यापुढे लोकांचे प्राण जाऊ नयेत म्हणून योग्य अशी प्राथमिक उपाययोजना कोणती?
(1) समुद्रकिनाऱ्याच्या धोकादायक भागासंबंधी लोकांना इशारा देणाऱ्या मोठ्या पाट्या किनाऱ्यावर ठिकठिकाणी लावाव्यात
(2) ''जीवसंरक्षक'' आणि जीव संरक्षण सामुग्री किनाऱ्यावर सतत उपलब्ध ठेवावी
(3) किनाऱ्यावर समुद्रस्नानाला बंदी घालावी
(4) सार्वजनिक घोषणा सामुग्री किनाऱ्यावर बसवावी व त्यावरून समुद्रस्नानाच्या धोक्याची सतत लोकांना सूचना देण्यात यावी.

---

७३) लोकसंख्या वाढीला आळा घालण्यासाठी लांब पल्याचे सर्वात योग्य धोरण कोणते?
(1) तीन मुले असलेल्या जोडप्यावर संततिनियमाच्या शस्त्रक्रियेची सक्ती करणे
(2) तीन किंवा जास्त मुले असणाऱ्या जोडप्यावर एक वेगळा कर लादणे
(3) प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रबोधन करणे
(4) ''ब्रह्मचर्यपालनाचे महत्त्व'' या विषयावर धार्मिक प्रवचने आयोजित करणे

---

७४) एका गृहसंकुलातील रहिवाशांकडून अशी तक्रार आलेली आहे की, त्याच्या शेजारच्या सार्वजनिक बागेसाठी आरक्षित केलेल्या भूखंडावर झोपडपट्टी उभारली जात आहे. या परिस्थितीत सर्वप्रथम ताबडतोब करावयाची उपाययोजना–
(1) झोपड्या तोडून झोपडपट्टीवासीयांना भूखंड सोडण्यास भाग पाडणे
(2) सार्वजनिक बाग उभारण्याचे काम सुरू करणे
(3) झोपडपट्टीवासीयांना पर्यायी जागा देऊन तेथून हलविणे
(4) या भूखंडावर झोपडपट्टीवासीयांसाठी पक्की घरे बांधणे व बागेसाठी दुसऱ्या भूखंडाची निवड करणे

---

७५) शहरातील व्यापारी भागात वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून योजावयाचा सर्वात परिणामकारक मार्ग म्हणजे–
अ) व्यापारी भागात वाहन आणण्याबद्दल 'टोल' कर बसविणे.
ब) फक्त ४ किंवा जास्त प्रवासी असलेल्या वाहनानांच व्यापारी भागात येण्याची परवानगी देणे.
क) अतिवाहतूक असलेल्या विभागात एकमार्गी वाहतूक चालू राहिल अशा रीतीने उड्डाणपूल बांधणे
ड) अतिवाहतूक आणि नेहमी वाहतूक कोंडी होणाऱ्या विभागात वाहन उभे करण्यास बंदी करणे (नो पार्किंग झोन) व हा नियम मोडणाऱ्यावर मोठा दंड लादणे.
(1) फक्त (अ) व (ब) (2) फक्त (अ), (क) व (ड)
(3) फक्त (क) व (ड) (4) सर्व एकत्र

---

७६) १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी अंदाजे शेकडा प्रमाण खालीलप्रमाणे होते –
(1) ५१% (2) ३९% (3) ४६% (4) २८%

---

७७) जकात महत्त्वाचे उत्पाचे साधन आहे.
(1) मिळकत कराच्या खालोखाल (2) व्यवसाय कराच्या खालोखाल
(3) हॉटेल कराच्या खालोखाल (4) सर्व करांमध्ये

---

७८) यूनोची पहिली जागतिक मानवी पर्यावरण परिषद् पुढीलपैकी कोणत्या शहरात भरली होती?
(1) नवी दिल्ली, भारत (2) स्कॉटहोम, स्वीडन
(3) इस्तंबूल, तुर्कस्तान (4) रिओ डी जानीरो, ब्राझील

---

७९) मेयोच्या १८७१ च्या कायद्याने –
(1) नगरपालिका प्रशासनात आर्थिक विकेंद्रीकरण आणले (2) भारतात लोकशाही आणली
(3) भारतात नियोजण आणले (4) भारतात नागरी नियोजन आणले

---

८०) नगर विकास विभागास बृहन्मुंबईच्या विकास योजनेस मंजुरी देण्याकरिता सल्ला देण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या सल्लागार समितीचे अध्यक्ष कोण होते?
(1) श्री. अरुण गुजराथी (2) श्री. तिनईकर (3) श्री. जे. बी. डिसूझा (4) श्री. शरद काळे

---

८१) चाळीतील खोल्यांचा आकार लहान असतो कारण ......
(1) राष्ट्रीय संपत्तीचा पर्याप्त उपयोग व्हावा (2) कुटुंब नियोजनास प्रेरणा मिळावी
(3) जास्त भाडे मिळावे (4) यापैकी काही नाही

---

८२) नागरी जमीन कमाल धारण अधिनियम, १९७६ हा विकास योजनेतील खालीलपैकी कोणत्या जमिनीस लागू होतो?
(1) बांधकाम अनुज्ञेय असलेला भूवापर (2) बांधकाम अनुज्ञेय नसलेला भूवापर
(3) रस्ते, उद्यान व मनोरंजन केंद्रे (4) नागरी हद्दीतील सर्व जमिनी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

८३) कोणत्या महामार्गास 'राष्ट्रीय महामार्ग' असे संबोधले जाते?
(1) देशातील सर्वाधिक रुंदीचा रस्ता
(2) राजधानीतील सर्वाधिक रुंद रस्ता
(3) राज्यांच्या राजधान्यांना जोडणारा मार्ग
(4) राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्तींकडून वापरला जाणारा मार्ग

---

८४) मुंबईत बहु पदरी रस्त्याने जाताना मागील वाहनाने पुढील वाहनाच्या पुढे जात असताना –
(1) फक्त डाव्या बाजूने जावे
(2) फक्त उजव्या बाजूने जावे
(3) डाव्या किंवा उजव्या बाजूने जाण्यास हरकत नाही
(4) कोणत्याही बाजूने पुढे जाऊ नये

---

८५) खालीलपैकी कोणत्या बाबीची पूर्तता होत असेल तर वास्तुशास्त्रज्ञास व्यवसायासाठी लायसन्सची गरज नसते?
(1) वास्तुशास्त्रातील पदवी
(2) भारतीय वास्तुशास्त्रज्ञ संस्थेचे सभासदत्व
(3) अखिल भारतीय वास्तुशास्त्रज्ञ मंडळाचे नोंदणीकरण
(4) वास्तुशास्त्रातील दहा वर्षांचा अनुभव

---

८६) स्थापत्य अभियंत्यास नगरपालिका हद्दीत अभियांत्रिकी व्यवसायासाठी कोणत्या प्राधिकरणाकडून परवाना घ्यावा लागतो?
(1) सार्वजनिक बांधकाम विभाग
(2) नगरपालिका/महानगरपालिका
(3) नगर रचना विभाग
(4) जिल्हाधिकारी

---

८७) कंत्राट पद्धतीतील कोणत्याही कामाच्या एका परिमाणाची (unit) किंमत खालील पद्धतीने काढतात.
(1) स्पेसिफिकेशन (दर्जा गणन)
(2) किमतीचे विश्लेषण (Value Analysis)
(3) दर विश्लेषण (Rate Analysis)
(4) आर्थिक विश्लेषण (Economic Analysis)

---

८८) कंत्राट पद्धतीने काम करून घ्यावयाचे असल्यास कामांचे खालील टप्पे कोणत्या क्रमानुसार असावेत?
अ) निविदांचा तुलनात्मक तक्ता करणे
ब) अनामत (Earnest) रक्कम भरून घेणे
क) निविदापत्र तयार करणे
ड) काम करण्याचे आदेश देणे
(1) अ–ब–क–ड
(2) ब–अ–ड–क
(3) अ–ड–क–ब
(4) क–ब–अ–ड

---

८९) १ सें.मी. = २०० मीटर या स्केलच्या नकाशावर १५ सें.मी. x २० सें.मी. या मापाच्या आयताकृती जमिनीचे प्रत्यक्ष क्षेत्रफळ किती होईल?
(1) ३,००० हेक्टर
(2) १,२०० हेक्टर
(3) ६,००० हेक्टर
(4) वरील सर्व चूक

---

९०) 'स्त्री–पुरुष प्रमाण' हे कोणत्या प्रकारे निर्देशित केले जाते?
(1) पुरुष संख्येचे स्त्री संख्येशी असलेले प्रमाण
(2) स्त्री संख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण
(3) दर हजार पुरुषांमागे असलेली स्त्रियांची संख्या
(4) दर हजार स्त्रियांमागे असलेली पुरुषांची संख्या

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

९१) जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही तोपर्यंत आरोपी निष्पाप समजला जातो व त्याअनुषंगाने कोणते विधान बरोबर आहे?
(1) आरोपीला आपण निष्पाप आहोत हे सिद्ध करावे लागेल
(2) सरकारपक्षाला आरोपीने गुन्हा केला हे सप्रमाण सिद्ध करावे लागेल
(3) 'मी निर्दोष आहे' हा बचाव होऊ शकत नाही
(4) मी अज्ञानी आहे हाही बचाव होऊ शकत नाही

---

९२) गुन्हेगाराला शिक्षा देण्यामागे कोणता हेतू असतो?
(1) भिती घालणे (2) प्रतिबंध करणे (3) सुधारणा घडवून आणणे (4) वरील तिन्हीचे एकत्रीकरण

---

९३) भारतीय संविधानात मूलभूत हक्कांचा समावेश कुठे आहे?
(1) कलम ३५६ (2) कलम ३६ (3) संविधानाचा दुसरा भाग (4) संविधानाचा तिसरा भाग

---

९४) खालील बाबींच्या संरक्षणासाठी मूलभूत हक्क आवश्यक मानण्यात आले आहेत–
(1) जनतेचे हक्क व स्वातंत्र्य (2) भारताचे स्वातंत्र्य (3) निधर्मी राज्य (4) जनतेची एकात्मता

---

९५) घटना म्हणजे काय?
(1) घटना म्हणजे देशाचा राज्यकारभार चालविण्याची सर्वोच्च राज्य पद्धती
(2) मानवी भावनांचे संकलन
(3) हिन्दुचे जीवनविषयक तत्त्वज्ञान
(4) एक पर्यावरणांची प्रक्रिया

---

९६) *विधान (अ) :* एकाच वेळेस एकापेक्षा अधिक पती असणे हे मुस्लिम स्त्रीच्या बाबतीत बेकायदेशीर आहे, असे नाही.
*कारण (र) :* मुस्लिम पुरुषास एकाच वेळेस चार बायका असू शकतात.
(1) (अ) आणि (र) हे दोन्हीही बरोबर आहेत आणि (र) हे (अ) चे स्पष्टीकरण आहे
(2) (अ) आणि (र) हे दोन्हीही बरोबर आहेत परंतु (र) हे (अ) चे योग्य स्पष्टीकरण नाही
(3) (अ) बरोबर आहे परंतु (र) चूक आहे
(4) (र) बरोबर आहे परंतु (अ) चूक आहे

---

९७) हिंदु कोणास दत्तक घेऊ शकतो?
(1) फक्त पुरुषास (2) फक्त स्त्रीस (3) फक्त अज्ञान व्यक्तीस (4) यापैकी कोणासही

---

९८) मुस्लिम व्यक्तीने आस मरण स्थितीत दिलेले देणगी ......
(1) ही योग्य देणगी आहे (2) ही सशर्त देणगी आहे
(3) ही देणगीच नाही (4) ही बेकायदेशीर आहे

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

Study CIRCLE

९९) खालीलपैकी कुठल्या मुद्यावर घटस्फोटाचा दावा दाखल करता येईल?

(1) २ वर्षांपेक्षा जास्त काळ ऐकमेकास त्याजणे (2) २ वर्षांपेक्षा जास्त काळ विभक्त राहणे

(3) मत–भेद असणे (4) मन न जुळणे

---

१००) *विधान (अ) :* जो मुस्लिम धर्म अनुसरतो तो मुस्लिम होय.

*कारण (र) :* अशी व्यक्ती जन्माने किंवा धर्मांतराने मुस्लिम असेल. त्या व्यक्तीने विशेष धार्मिक कृत्ये किंवा समारंभ करणे आवश्यक आहे असे नाही.

(1) (अ) आणि (र) हे दोन्हीही बरोबर आहेत आणि (र) हे (अ) चे स्पष्टीकरण आहे.

(2) (अ) आणि (र) हे दोन्हीही बरोबर आहेत परंतु (र) हे (अ) चे स्पष्टीकरण नाही

(3) (अ) बरोबर आहे परंतु (र) चूक आहे

(4) (अ) चूक आहे परंतु (र) बरोबर आहे

---

Study CIRCLE

**Answers**

१) ''प्रपत्र'' हे ...... संसूचनाच्या प्रकारचे उदाहरण होय.

(1) अनौपचारिक (2) अधोगामी (3) औपचारिक (4) यापैकी कोणतेही नाही

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–३ | २–३ | ३–२ | ४–१ | ५–४ | ६–३ | ७–४ | ८–२ | ९–३ | १०–३ |
| ११–२ | १२–१ | १३–२ | १४–३ | १५–३ | १६–२ | १७–४ | १८–१ | १९–४ | २०–२ |
| २१–२ | २२–४ | २३–४ | २४–३ | २५–२ | २६–४ | २७–२ | २८–३ | २९–३ | ३०–४ |
| ३१–४ | ३२–२ | ३३–१ | ३४–३ | ३५–२ | ३६–४ | ३७–१ | ३८–३ | ३९–४ | ४०–४ |
| ४१–४ | ४२–३ | ४३–३ | ४४–२ | ४५–३ | ४६–३ | ४७–२ | ४८–३ | ४९–४ | ५०–१ |
| ५१–३ | ५२–४ | ५३–४ | ५४–१ | ५५–२ | ५६–२ | ५७–३ | ५८–३ | ५९–२ | ६०–४ |
| ६१–२ | ६२–४ | ६३–४ | ६४–४ | ६५–४ | ६६–२ | ६७–४ | ६८–३ | ६९–४ | ७०–१ |
| ७१–३ | ७२–१ | ७३–२ | ७४–३ | ७५–२ | ७६–२ | ७७–४ | ७८–२ | ७९–१ | ८०–२ |
| ८१–४ | ८२–४ | ८३–३ | ८४–१ | ८५–३ | ८६–३ | ८७–३ | ८८–४ | ८९–२ | ९०–२ |
| ९१–२ | ९२–४ | ९३–४ | ९४–१ | ९५–१ | ९६–४ | ९७–४ | ९८–४ | ९९–४ | १००–३ |